मजकुर :—

दिनांक ०९/०७/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **Best Detection of the Month** " माहे मे २०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मे — २०२१

| | | |
|---|---|---|
| ०७ | भांडूप पोलीस ठाणे<br>परिमंडळ — ०७ | गुरक्र. १३६/२०२१ कलम ३०२, ३९४, ३९७, २०१, २०२, ३४ भा.द.वि. |

—: ' जबरी चोरी करून खुन ':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत : नमुद गुन्हयात दिनांक १४/०४/२०२१ रोजी १८.०० वा ते दिनांक १५/०४/२०२१ रोजी १२.०० वा. च्या दरम्यान फिर्यादी श्रीमती डिंम्पल कमलेश शहा, यांची आई श्रीमती रतनबेन मोहनलाल जैन, वय ७० वर्षे हया घरी एकटयाच होत्या. सदरवेळी त्यांच्या घरात घुसुन अज्ञात इसमाने जबरी चोरच्या उद्‌देशाने कोणत्यातरी धारदार शस्त्राने तिचा गळा कापुन त्यांना जीवे ठार मारले. तसेच त्यांच्या अंगावरील एकुण रू. ३,५०,०००/— किंमतीचे दागिने जबरीने चोरून पळुन गेले म्हणुन गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती डिंपल कमलेश शहा, वय ४५ वर्षे, |
| बळीत | :— | श्रीमती रतनबेन मोहनलाल जैन, वय ७० वर्षे, |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :— | १) १५ ग्रॅम वजनाची जुनी वापरती गळयातील सोन्याची पेडंटसह चैन— किं.अं.रु. ७०,०००/—<br>२) जुन्या वापरत्या दोन सोन्याच्या बांगडया वजन अंदाजे ७० ग्रॅम— किं.अं.रु. २,००,०००/—<br>३) जुनी वापरती दोन हिरे जडीत कर्णफुले वजन अंदाजे ५ ग्रॅम— किं.अं.रु. ८०,०००/—<br>**एकुण किं.रु.३,५०,०००/—** |
| हस्तगत मालमत्ता | :— | १) १५ ग्रॅम वजनाची जुनी वापरती गळयातील सोन्याची पेडंटसह चैन— किं.अं.रु. ७०,०००/—<br>२) जुन्या वापरत्या दोन सोन्याच्या बांगडया वजन अंदाजे ७० ग्रॅम— किं.अं.रु. २,००,०००/—<br>३) जुनी वापरती दोन हिरे जडीत कर्णफुले वजन अंदाजे ५ ग्रॅम— किं.अं.रु. ८०,०००/—<br>**एकुण किं.रु.३,५०,०००/—** |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) इम्रान मुन्ना मलिक, वय २५ वर्षे,<br>२) दिपाली अशोक राऊत, वय ३६ वर्षे,<br>दिनांक. २८/०५/२१ रोजी |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने तपासी पथकाने बळीत महिला राहत असलेल्या कंपाउंड मधील ८० रहिवाशी सदनिका व २० दुकाने चे धारक असणाऱ्या लोकांकडे चौकशी केली तसेच तपासाच्या अनुषंगाने आवश्यक असे ८ ठिकाणचे फुटेज ताब्यात घेऊन त्यातील २५० हालचाली तपासल्या. तसेच बळीत महिलेच्या संपर्कात असलेले ७२ मोबाईल क्रमांक चे धारक तसेच तिचे डायरीत नोंदी असलेले ४६० मोबाईल क्रमांकाचे धारकांचे मोबाईल तपासले.

नमुद गुन्हयाच्या दिवशी व वेळीचा डम डेटा घेवून त्यातील ५०० मोबाईल धारक यांचे फोन तपासले तसेच २४० मोबाईल क्रमांकाच्या ब्क्त चे विश्लेषण करण्यात आले. बळीत महिला ही परिसरातील लोकांना व्याजाने पैसे देत असल्याने असे पैसे दिलेल्या १८ लोकांकडे तपासाच्या दृष्टीने चौकशी केली. बळीत महिलेचे ३० नातेवाईक चौकशी दरम्यान तपासले. गुन्ह्याच्या दिवशी संशयीत वर्तन असलेले बळीत महिलेच्या परिसरात राहणारे व संपर्कात असलेले एकुण २३ लोकांकडे चौकशी केली.

गुन्हयाच्या घटनास्थळाच्या बाजूला कंपाउंडमध्ये पार्क असलेली २४० मोटार वाहने, ऑटोरिक्षाच्या चालक

मालक यांच्याकडे तपास केला. गुन्हा घडला त्या कालावधीत बळीत राहत असलेल्या चाळीतील गावी गेलेल्या ४० लोकांबद्दल माहिती घेऊन त्याच्याकडे तपास केला. नमूद गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलिस ठाणे हद्दीतील ९८ ज्वेलर्स दुकानदार यांच्याकडे चोरच्या मालाबाबत चौकशी केली. बळीत महिला फेरीवाले आंबे विक्रेते याच्याकडून आंबे विकत घेत असल्याची माहिती मिळाल्याने सदर परिसरात फेरी करणारे १८ आंबे विक्रेते यांना पोलीस ठाण्यात बोलावून गुन्हयाच्या दृष्टीने तपास केला. नमूद गुन्ह्याच्या अनुषंगाने मयत महिलेच्या कुटुंबामध्ये मालमत्तेबाबत वाद आहे किंवा कसे याबाबत तिचे नातेवाईकांकडे तपास केला.

नमूद गुन्हयाच्या अनुषंगाने घटनास्थळाचा आजूबाजूला परिसरातील चोरी, घरफोडी व रॉबरी करणारे त्याचबरोबर शस्त्रांनिशी चोरी करणारे अभिलेखावरील २९ आरोपींची तपासणी केली. गुन्ह्याचे घटनास्थळ परिसर व पोलीस ठाणे हद्दीतील ३२ नशा करणारे लोकांना पोलीस ठाण्यात आणून त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास केला. नमूद गुन्ह्यातील मयत महिला हिचे मरणाबाबत तिच्या मरणाची प्रसिद्धी देऊन व त्याबाबत भांडुप परिसरात तिचे वर्णन असलेले फोटो लावून प्रसिद्धी करण्यात आली. तिच्या मृत्यूबाबत माहिती देणाऱ्या रू. ५१०००/— चे बक्षीस ठेवण्यात आले परंतु कोणतीही माहिती मिळून आली नाही.

सध्या संपूर्ण राज्यात व मुंबई शहरात कोरोना विषाणू च्या संसर्गामुळे लोकडाऊन घोषित आहे. सदर कालावधीत सुध्दा तपास पथकाने नमूद गुन्ह्यात कोणताही पुरावा नसताना मानवी कौशल्याचा व तांत्रिक माहितीचा अचूक वापर करून आरोपी निष्पन्न केला. सदर आरोपी हा गुन्हा केल्यानंतर सुरवातीस परिसरात राहून तपास पथकास वेगवेगळी माहिती देवून दिशाभूल करीत होता. पोलीस पथकाने केलेल्या कौशल्यपूर्ण तपासामुळे आपले नाव निष्पन्न होत असल्याचा त्यास सुगावा लागला असता, आरोपी मुंबई शहरातून पळून गेला होता. सदर आरोपीबाबत गोपनीय माहिती मिळवून तांत्रिक विश्लेषण करून पथकाने गुन्हयातील पाहीजे आरोपी इम्रान मूनने मलिक यास बिजनोर, उत्तर प्रदेश येथून दिनांक २७/०५/२०२१ रोजी मध्यरात्री ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याचा गुन्ह्यात सहभाग निश्चित झाल्याने नमूद गुन्हयात त्यास अटक करण्यात आली.

नमुद गुन्हयाच्या तपासात तपासी पथकाने कोणताही सुगावा नसताना अथक परिश्रम घेवुन ४० दिवस अहोरात्र कसून मेहनत करून अचुक तपास केला. व तपासादरम्यान आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

**भांडूप पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | शाम सखाराम शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | नितीन मोतिराम उन्हवणे (तपासी अधिकारी ) | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | संतोष मारूती कांबळे ( मुलुंड पो. ठा.) | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | बाबासाहेब महादेव दुकले (पार्कसाईट पो. ठा.) | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सुनील जगन्नाथ जातक (कांजूरमार्ग पो. ठा.) | प्रशस्तीपत्रक |
| ६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सुर्यकांत दगडुजी पारटकर | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | उमेश सरेश शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पोलीस उप निरीक्षक | रविकांत सुधकार नंदनवार | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पोलीस उप निरीक्षक | शरद सदाशिव बागल | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक | दिनेश सुदाम बागुल | |
| ११ | पोलीस उप निरीक्षक | अमित अशोकराव यादव | |
| १२ | सफौ. २४९३० | सुर्यकांत शिवाजी मडव | प्रशस्तीपत्रक |
| १३ | सफौ.८८५१ | संजय बाळकृष्ण मालवणकर | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पोहक्र २९२०० | सुनिल सुखदेव पवार | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र.२९२६५ | नागेश बाळाराम दरेकर | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह. क्र ३४१०४ | धनराज रामभाऊ आव्हाड | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | पो.ह. क्र. १२८२२ | दिनेश विष्णु पाटील | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ना. क्र.९८०११४ | अनिल ज्ञानोबा वाघ | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ना. क्र.०४०९५७ | मिनानाथ मचिंद्रनाथ कासार | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि. क्र.०६१८९७ | रंजित अशोक ठाकुर | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि. क्र. ०७०३२४ | आनंदा सिधप्पा मानकर | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि. क्र.०७०९०३ | धिरेश प्रकाश गरूड | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि. क्र.०८०२८२ | लालसिंग रेवू राठोड | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पों.शि. क्र.०९००७५७ | उमाकांत जिजाबा पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि. क्र .०९८७३ | प्रविण अशोक खरे | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि. क्र.०९०८४१ | सुर्यकांत भुपाळ शेट्टी | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि. क्र.०९१०६६ | संतोष विक्रम राठोड | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि. क्र.०९२९५९ | निनाद धर्मा जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.शि.क्र.०९३५७९ | सुशांत अविनाश भामरे | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.शि. क्र.११०८१४ | बाळु श्रीमंत कोळी | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.शि. क्र.१११५३५ | किरण देवीदास निकम | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.शि. क्र.१११९४५ | नथु पुंढलिक कचरे | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पो.शि. क्र.११०६३८ | रोहीदास लहाणु पवार | प्रशस्तीपत्रक |
| ३४ | पो.शि. क्र.१११६१९ | प्रकाश मुकुंद गोंधळी | प्रशस्तीपत्रक |
| ३५ | म.पो.शि. क्र.११२०३० | विद्या नवनाथ बंडलकर | प्रशस्तीपत्रक |

टिपः— वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भांडूप पोलीस ठाणे यांना कळविण्यात येते की, Best Detection of the Month May – २०२१ 'उत्कृष्ट गुन्हे शोध' या करीता निवड झाले नंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | च्तवचमतजल वर्मिदबम बाबतीत<br>ंद्ध गेलेला माल<br>इद्ध जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>ंद्ध घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | ंप्दुनमेज पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | क्छ। टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | ब्क्त्ध्क्त्ध्ब्ब्ज्ण्टध्म्समबजतवदपब म्अपकमदबम बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | ब्लइमत म्गचमतज ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | थ्वत्म्छैष्ब् म्गचमतज ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | क्वहॅनंक ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | थ्पदहमतचतपदज ६ भ्दकूतपजपदह म्गचमतज ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी च्वतजतंपज बाबत म्गचमतज ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅंग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |

| | | |
|---|---|---|
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब, शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, **Inquest** पंचनामा,घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी–यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.